५) रेखांकनातील सर्व नियोजित रस्ते व गटारे अर्जदार यांनी स्थानिक प्राधिकरणाच्या नियमाप्रमाणे समाधानकारकरित्या समपातळीत आणावयाचे आहेत व बांधावयाचे आहेत. तसेच रेखांकनातील खुले क्षेत्र अर्जदार यांनी समपातळीत आणणेचे आहे व त्याचा विकास बाग, उद्यान क्रिडांगण या सार्वजनिक प्रयोजनासाठी करणेचा आहे. अर्जदार यांना सदरच्या खुल्या क्षेत्राचे भूखंडाचा विकास जरी केला असला तरी ही मालकी मात्र महाराष्ट्र शासनाची राहणार असून सदरचे **०२.५५.०१** हे. आर. क्षेत्र विनामुल्य हस्तांतरणाबाबतचा प्रतिज्ञालेख अर्जदार यांनी तहसिलदार रत्नागिरी यांचेसमोर लिहून पूर्ण करुन देवून देखभालीसाठी **ग्रामपंचायत प्रिंदावण** यांचे ताब्यात देण्याचे आहे व तसा पूर्तता अहवाल तहसिलदार राजापूर यांचेकडे १ महात सादर करणेचा आहे.

६) रेखांकनातील रस्ताखालील क्षेत्र **०३.३४.८० हे.आर.** अर्जदार यांनी विनामोबदला स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच **ग्रामपंचायत प्रिंदावण** यांचे ताब्यात देण्याचे असून त्यासंबंधीचा प्रतिज्ञालेख देखील अर्जदार यांनी स्वखर्चाने तहसिलदार राजापूर यांचेसमोर पूर्ण करुन ठेवून त्या संबंधीचा पूर्तता अहवाल तहसिलदार यांचेकडे १ महात सादर करणेचा आहे.

७) रेखांकनातील जमिनीमध्ये नैसगिक सांडपाणी व पावसाचे पाणी वाहून जाण्याकरिता असणारे नैसर्गिक मार्ग खुले राहतील मुळात जर असे नैसगिक मार्ग नसतील तर नविन मार्ग तयार करणेची आवश्यकता असल्यास ते तयार करण्यात येवून त्यातील पाणी सदरच्या रेखांकनाला जवळ असलेल्या नैसर्गिक प्रवाहात सोडण्याची अथवा त्याची पर्यायी व्यवस्था करण्याची जबाबदारी अर्जदार यांची राहील.

८) नियोजित केलेल्या भूखंडात प्रस्तावित केलेले रेखांकन संदर्भात वर उल्लेखिलेल्या शर्तीची पूर्तता करणेत आले नंतरच भूखंड धारकांना जिल्हाधिकारी यांचेकडून बांधकाम परवानगी अनुज्ञेय राहील. या आदेशान्वये देण्यात आलेली रेखांकन मंजूरी व बिनशेती परवानगी म्हणजे नियोजित भूखंडात बांधकामे अनूज्ञेय असा नसून भूखंड धारकांनी स्वतंत्ररित्या बांधकाम नकाशे मंजूर घेणे आवश्यक आहे.

९) अर्जदार यांनी सादर केलेली माहिती चुकीची अथवा दिशाभूल करणारी आढळून आल्यास अगर मंजूर रेखांकनात फेरबदल केलेचे आढळून आल्यास देणेत आलेली परवानगी आपोआप रदद होईल.

१०) नगर रचनाकार, रत्नागिरी यांचेकडील उपाद्घातातील पत्र क्रमांक ७ मधील अटी व शर्ती परवानाधारक यांचेवर बंधनकारक राहतील.

ठिकाण : राजापूर

दिनांक : २९/०८/२०१२

तहसिलदार राजापूर
तहसिलदार राजापूर

तहसीलदार राजापूर
जि. रत्नागिरी
सत्यमेव जयते

**प्रत :-**

१) **श्री. अरविंद सुरेश कांबळे वगैरे २ रा. टेंबवली ता.देवगड जिल्हा सिंधुदूर्ग** यांजकडे मंजूर रेखांकन नकाशासह.
२) तलाठी सजा **उपळे** यांजकडे योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी.
३) तालुका निरीक्षक भूमी अभिलेख रत्नागिरी यांजकडे मंजूर रेखांकनासह रवाना.

२/-सदरच्या मंजूर रेखांकन नकाशा प्रमाणे दुरुस्त आकार फोड पत्रक तयार करुन त्याचा अंमल गांव कागदी देण्यासाठी या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे.

सही (xxx)
तहसिलदार राजापूर